# महाराष्ट्र शासन

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कल्याण विभाग
गांधी टॉवर, ३ रा मजला, बैल बाजार चौक, कल्याण (प), जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२५१-२२०७०४२ E-mail : jddish.kal mh@gov.in

---

क्र. ससंऔसुवआ/4507/कल्याण/२०२५ दिनांक- 19 NOV 2025

प्रति,
भोगवटादार/व्यवस्थापक

विषयः- महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील दुरुस्त्यांबाबत जनजागृती मोहिम.

संदर्भः- १. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाची शासन अधिसूचना क्र. एफएसी २०२५/प्र.क्र. ११७(भाग-2)/कामगार-४, दिनांक ०३/१०/२०२५.
२. मा.संचालक यांचे परिपत्रक क्र. संसऔसुवआ/सूट/८४४५/११ दि. १७/११/२०२५

महोदय,

महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त संदर्भित अधिसूचना दिनांक 03/10/2025 अन्वये महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मध्ये खालील महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत.

1. **कामगारांच्या वैद्यकीय तपासणीबाबत**:- यापूर्वी कामगारांची वैद्यकीय तपासणी केवळ प्रमाणक शल्यचिकित्सक (Certifying Surgeon) यांच्याद्वारेच करण्याची अनुमती होती. आता शासनाने खालील वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही तपासणी करण्यास मान्यता दिली आहे.

अ) शासनाने नेमलेले / प्राधिकृत केलेले प्रमाणक शल्यचिकित्सक (Certifying Surgeon)
ब) अर्हता धारक वैद्यकीय व्यावसायिक (Qualified Medical Practitioner - MBBS)
क) ईएसआयसी / ईएसआयएस चा वैद्यकीय अधिकारी (ESIC / ESIS Medical Officer)
ड) किमान 5 अर्हता धारक वैद्यकीय व्यावसायिक असलेली संस्था

2. **महिला कामगारांच्या रात्रपाळीतील कामा संदर्भात**:- यापूर्वी महिला कामगारांना रात्रपाळीत काम करण्यासाठी लागू असलेल्या अटींमध्ये कपात, सुलभीकरण आणि युक्तीकरण (rationalization) करण्यात आले असून, महिला कामगारांच्या सुरक्षेची योग्य काळजी घेत लवचिकता वाढविण्यात आली आहे.

3. **<u>नियम 114 अंतर्गत महिला कामगारांवरील निर्बंधांमध्ये शिथिलताः</u>**- महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ चे नियम 114 अंतर्गत ज्या प्रक्रियांमध्ये महिलांना काम करण्यास बंदी होती, त्या विविध अनुसूचींमध्ये आता शिथिलता देण्यात आली आहे.

( सु.सा.जोशी )

सह संचालक

औद्योगिक सुरक्षा आरोग्य,

कल्याण.